# प्रेस नोट

दिनांक -२०.०८.२०१८

## स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची अवेध दारु वाहतुकीवर धडक कारवाई, देवगड व कुडाळ येथील मोबाईल चोरीच्या गुन्हयांचा पर्दाफाश व फेर अटकेतील आरोपीस जेरबंद.

---

श्री. दिक्षीतकुमार गेडाम, पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग व श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक यांनी सिंधुदुर्ग जिल्हयातील अवैध दारु विक्री व वाहतुक यांचेवर कडक कारवाई करण्यासाठी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी तसेच स्थानिक गुन्हे शाखा सिंधुदुर्गचे अधिकाऱ्यांना आदेश दिलेले होते. त्यानसार सिधुदूर्ग जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनकडून तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून अवैध दारु धंदयाविरुध्द मोहीम सुरु आहे. अवैध दारु वाहतुकीच्या तक्रारीच्या संदर्भातील माहीतीची शहनिशा करण्याचे काम खबऱ्यामार्फत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून सुरु होते. त्यानुसार सिंधुदुर्ग जिल्हयात सिमावर्ती भागात अवैध दारु वाहतुक होते या बाबत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेस माहीती प्राप्त झालेली होती. त्यानुसार त्याची खब-यामार्फत माहीती काढण्याचे काम चालू असताना दि.२०.०८.२०१८ रोजी गोवा बनावटीच्या दारुची वाहतूक होणार असल्याची माहीती मिळाल्यानंतर स्थागुशा सिंधुदुर्गचे पोलीस निरीक्षक श्री. प्रल्हाद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक रविराज फडणीस, सपोफौ/खांदारे, पोकॉ/ कादळगांवकर, सरमळकर, तेली यांनी ओरोस खर्येवाडी पेट्रोलपंपाजवळ सापळा रचून गोव्याकडून मुंबई कडे जाणारा टाटा एस टेम्पो थांबवुन तपासणी केली असता सदर टेम्पो मध्ये २,७०,०००/-रु. किंमतीची गोल्ड ॲण्ड ब्लॅक थ्री एक्स रम चे ५० बॉक्स व गोल्डन एस• लेबल चे १०० बॉक्स अशी गोवा बनावटीची दारु व ५ लाख रुपये किमतिचा टाटा एस टेम्पो मिळून **७,७०,०००/- रु. किमतीचा मुद्देमाल** जप्त करण्यात आला. त्याबाबत आरोपी विरुद्ध सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला.

तसेच साटेली भेडशी ता दोडामार्ग येथे गोवा बनावटीची दारुची अवैध विक्री केली जाते अशी माहीती मिळालेवरुन स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक प्रल्हाद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोहेकॉ/ सुधीर सावंत, आशिष गंगावणे, पोना/ मनोज राऊत, अनिल धुरी, अनुपकुमार खंडे, प्रवीण वालावलकर यांनी छापा टाकुन आरोपीत याचे ताब्यातुन **५, ६४०/- रुपये** किमतिची गोवा बनावटीची दारु असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीत याचे विरुद्ध दोडामार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

माहे डिसेंबर २०१७ मध्ये देवगड येथील सह केळकर महाविद्यालयातील ग्रंथालयामध्ये अभ्यास करण्याकरीता बसलेल्या विदयार्थीनीचे दप्तरातील विवो कंपनीचा मोबाईल अज्ञात चोरटयाने चोरुन नेल्याबाबत देवगड पोलीस ठाण्यात दि. ०३.०३.२०१८ रोजी अज्ञात आरोपीत याचे विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. अज्ञात आरोपीत याचा शोध घेण्याबाबत श्री दिक्षीत गेडाम, पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग व श्री प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक प्रल्हाद पाटील यांना सुचना दिलेल्या होत्या. सदर अज्ञात आरोपीत याचा स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक प्रल्हाद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखचे पोलीस उप निरीक्षक श्री शाहू देसाई, पोहेकॉ/ कोयंडे, पोकॉ/ गावडे मपोकॉ/ योगीता

राणे, यांनी विशेष प्रयत्न करुन अज्ञात आरोपीत याचेबाबत माहीती काढून गुन्हयातील चोरीस गेलेला मोबाईल हस्तगत करुन गुन्हा उघडकीस आणला.

मत्सगंधा एक्सप्रेस या रेल्वे मध्ये फिर्यादी हया प्रवास करीत असताना फिर्यादीच्या बॅगेमधील विवो कंपनीचा मोबाईल चोरीस गेलेला होता. सदर बाबत कुडाळ पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीत याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच पोलीस निरीक्षक प्रल्हाद पाटील याचे मार्गदर्शनाखाली सपोफौ/ संजय आंबेरकर, पोकॉ/ खाडये, इंगळे, गावडे यांनी विशेष प्रयत्न करुन अज्ञात आरोपीत याचा शोध घेवुन सदरचा गुन्हा हा केज, कुंभेफळ, जि. बीड येथील आरोपीत याने केल्याबाबत माहीती प्राप्त करुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

**सन १९९९ पासुन** मालवण येथील खुनाचा प्रयत्नातील आरोपी हा मा. जिल्हा व सत्र न्यायालय सिंधुदुर्ग येथील केस नंबर ७२/१९९९ हजर राहत नसल्याने मा न्यायालयाने सदर आरोपीत याचे विरुद्ध अटक वॉरन्ट काढून स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेत बजावणीकरीता देण्यात आलेले होते. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक प्रल्हाद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सपोफौ/ खांदारे, पोहेकॉ/ प्रसाद सावंत, पोकॉ/ कादळगांवकर, सरमळकर यांनी आरोपीत याचे ठावठिकाणाबाबत माहीती काढून आरोपीत यास बोरीवली येथुन ताब्यात घेवुन त्यास मा न्यायालयात हजर करण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई ही श्री दिक्षीत गेडाम, पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग, श्री प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांचे मार्गदर्शनाखाली प्रल्हाद पाटील, पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक रविराज फडणीस, शाहू देसाई व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस पथकाने केलेली आहे. वरील कारवाई संदर्भात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांचे वरीष्ठांनी अभिनंदन केलेले आहे.

---

पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग करीता